सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०१७–१८/६३० दिनांक : १८/०१/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक/ मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग

**विषय : 'लोकशाही पंधरवडा' साजरा करण्याबाबत.**
**संदर्भ क्र. : राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे रानिआ/रापनों–२०१७/प्र.क्र.१४/का–११, दि. ०६ जानेवारी, २०१८ चे पत्र**

महोदय/महोदया,

७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीस २५ वर्षे पूर्ण झाल्याच्यानिमित्ताने राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने दिनांक २ व ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी 'लोकशाही, निवडणुका व सुशासन' या विषयावर एक राष्ट्रीय परिषद मा. राज्यपाल महोदय व मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये 'लोकशाही सुदृढ करण्यासाठी सर्व लोकांना आवश्यक त्या सर्व विषयांवर सतत शिक्षणाद्वारे जागरूक करणे आवश्यक आहे' ही बाब दिसून आली म्हणून 'लोकशाही, निवडणुका व सुशासन' या विषयावर सर्व लोकांना सतत शिक्षण देण्यासाठी काही नवीन उपाययोजना करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने राज्यामध्ये दरवर्षी २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात यावा, असे आदेश दिले आहेत. त्यानुसार लोकशाही पंधरवड्यात विविध उपक्रमांचे आयोजन अतिशय काटेकोरपणे करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. याबाबतचे राज्य निवडणूक आयोगाचे पत्र आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडत आहे.

आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्था/सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदव्युत्तर विभागामध्ये राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त संदर्भीय पत्रात नमूद केल्यानुसार कार्यक्रमांचे व उपक्रमांचे आयोजन आपल्यामार्फत अतिशय काटेकोरपणे व्हावे. याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. सदर पत्र आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थेत/पदव्युत्तर विभागातील मुख्य सूचना फलकांवर प्रदर्शित करून संबंधितांच्या निदर्शनास आणून लोकशाही पंधरवड्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. याबाबत विद्यार्थी विकास अधिकारी, रासेयो कार्यक्रम अधिकारी आणि महाविद्यालये, संस्था व विद्यापीठ विभागांतील इतर शिक्षकांनाही कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार सहभागी करून घेऊन जबाबदारी निश्चित करावी. कळावे, ही विनंती

**सोबत : वरीलप्रमाणे.**

संचालक,(अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

"लोकशाही पंधरवडा" साजरा करण्याबाबत-
"लोकशाही, निवडणूक व सुशासन"या विषयावर
सर्वसामान्यांसाठी सतत शिक्षण देण्याकरिता...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/रापनों -२०१७/प्र.क्र. १४/का-११,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ६ जानेवारी, २०१८.

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेप्रमाणे भारत हा सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक (Sovereign, Socialist, Secular, Democratic Republic) देश असून, त्यांनी त्रिस्तरीय लोकशाही पध्दत स्वीकारली आहे. ही लोकशाही बळकट करण्याच्या दृष्टीने सन १९९२ मध्ये ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांना "स्वतंत्र स्थानिक शासन" म्हणून सांविधानिक मान्यता देण्यात आली असून त्यांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शकरित्या घेण्यासाठी प्रत्येक राज्यामध्ये स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली.

२. लोकशाही बळकटीकरणासाठी जरी सर्व स्तरावर लोकांचा सक्रीय सहभाग आवश्यक असला तरीही गेल्या दोन दशकात झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा अनुभव लक्षात घेता अनेक मुद्यांवर आता कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे, उदा. :-

(i) देशाच्या विकास प्रक्रियेमधील स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व, स्थान व भूमिका अधोरेखित करणे.

(ii) राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र असल्याची जाणीव करून देणे.

(iii) लोकशाहीचे संवर्धन, संरक्षण आणि बळकटीकरण (Preservation, Protection & Strengthening) करण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोग आणि शासनाबरोबरच सर्वांचीच आहे, याबाबत व्यापक कार्यक्रम हाती घेणे, इत्यादी.

३. वरील बाबी लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने गेल्या २-३ वर्षांमध्ये अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत :-

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांचे व त्यांच्या निवडणुकांचे महत्व, याबाबत सर्व स्तरावरील अधिकारी व पदाधिकारी यांना अवगत करणे.

(ii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेताना लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेणे.

(iii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत संशोधन करणे.

(iv) राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांच्या प्रथम वर्गामध्ये प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्जाद्वारे "१८ वर्षे पूर्ण झाल्याबरोबर मी माझे नाव मतदार यादीत नोंदवून घेणार आहे", या आशयाचे प्रमाणपत्र घेणे;

(v) विद्यापीठे व महाविद्यालयांतील प्रथम वर्षाच्या सर्व विषयांसाठी "लोकशाही, निवडणूक व सुशासन" हा विषय अनिवार्य करणे, इत्यादी.

४. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीस २५ वर्षे पूर्ण झाल्याच्यानिमित्ताने राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने दिनांक २ व ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी "लोकशाही, निवडणुका व सुशासन" या विषयावर एक राष्ट्रीय परिषद मा. राज्यपाल महोदय व मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये "लोकशाही सुदृढ करण्यासाठी सर्व लोकांना आवश्यक त्या सर्व विषयांवर सतत शिक्षणाद्वारे जागरुक करणे आवश्यक आहे" ही बाब दिसून आली. म्हणून "लोकशाही, निवडणुका व सुशासन" या विषयावर सर्व लोकांना सतत शिक्षण देण्यासाठी काही नवीन उपाययोजना करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करून राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

## आ दे श

(अ) राज्यामध्ये दरवर्षी २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात यावा.

(ब) प्रजासत्ताक दिनी दिनांक २६ जानेवारी रोजी होणाऱ्या सर्व शासकीय / निमशासकीय कार्यक्रमामध्ये मुख्य वक्त्यांच्या भाषणामध्ये "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर कमीत कमी ३ ते ४ वाक्ये असावीत. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व; निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुका घेण्यासाठी सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी निर्भीडपणे काम करण्याची गरज; लोकशाही जोपासण्यासाठी व टिकविण्यासाठी सर्व लोकांनी जागरुक राहण्याची गरज, इत्यादी विषयांचा समावेश असावा.

(क) तसेच दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या सर्व शासकीय व निमशासकीय कार्यक्रमांमध्ये व तसेच मुख्य वक्त्यांच्या भाषणामध्ये या विषयावर कमीत कमी ३ ते ४ वाक्ये असावीत. ("ब" प्रमाणे) "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयाचे बॅनर्स लावण्यात यावेत.

(ड) या कालावधीत (दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रुववारी) सर्वांच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर वरील विषयावर (लोकशाही, निवडणूक व सुशासन) जनजागृती मोहीम हाती घेण्यात यावी, उदा.-

(i) विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये या विषयावर निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, इत्यादींचे आयोजन करावे.

(ii) सर्व उद्योग समूहांनी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करावे.

(iii) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी यांनी निवडणुकीच्या वेळी दिलेल्या वचनपूर्तीच्या अनुषंगाने खुलामंच/खुलीचर्चा यासारखे कार्यक्रम आयोजित करावेत.

(iv) वृत्तपत्रे, मासिके यासारख्या छापील, सोशल मीडिया व स्थानिक केबल नेटवर्क यांचा वापर करून उपरोक्त कालावधीत ७३ व ७४ वी राज्य घटना दुरुस्ती, त्याअनुषंगाने निर्माण करण्यात आलेली लोकशाहीची त्रिस्तरीय रचना, तसेच नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य याबाबत माहिती द्यावी.

(v) आवश्यक त्या ठिकाणी होर्डिंग्ज, बॅनर्स, (टी.व्ही., रडिओ, प्रेरा, इत्यादी) लावणे.

(vi) सर्वांची मदत घेणे, उदा. रेस्टॉरन्ट/हॉटेल्स, बँकांच्या शाखा, मॉल्स, इत्यादी

५.  पंधरवडा योग्य रितीने साजरा करण्याच्या दृष्टीने सर्व विभागाच्या सचिवांनी त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयांना आवश्यक त्या सर्व सूचना द्याव्यात.

६.  जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्त; तसेच विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांनी सर्व विभागांशी समन्वय साधून पंधरवड्याची रुपरेषा आखावी व पंधरवडा यशस्वीरीत्या साजरा होईल, याची दक्षता घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( शेखर चन्ने )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव
३. सचिव (सर्व विभाग)
४. विभागीय आयुक्त (सर्व)
५. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
६. जिल्हाधिकारी (सर्व)
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. सर्व विद्यापीठे
९. राज्य निवडणूक आयोगातील कार्यासने
१०. निवड नस्ती